# विज्ञान आणि अध्यात्म

dt.18th April 2010

मानवाच्या भौतिक प्रगतीचा आढावा घेतला तर असं लक्षात येतं की, प्रथम अग्नीच्या आणि त्यानंतर चक्राच्या शोधाने क्रांती घडली. चाकाच्या शोधानंतर मानवी जीवन खरोखर गतिमान झालं. ऊर्जेचा पुरवठा चक्राला करून शक्ती आणि गती यांची योग्य जुळवणूक केल्यानंतर तर त्याची प्रगती आणखी झपाट्याने झाली.

विश्वाच्या रहस्याचा पूर्ण उलगडा आधुनिक विज्ञानाला अजूनही करता आला नसला तरी शक्तीच्या वर्तुळाकार गतीचे अनेक सिद्धांत विज्ञानाने प्रतिपादिले आहेत. जल-चक्र, कार्बन-चक्र, नायट्रोजन-चक्र हे सगळे सिद्धांत शक्तीच्या वर्तुळाकार गतीचा वेध घेण्याचा प्रयत्न करतात. वर्तुळाकार गती म्हणजे शक्ती निर्मिती जिथून झाली तिथून तिचे गमन होऊन संपूर्ण विश्वाला गवसणी घालून शक्ती पुन्हा मूळ निर्मितीच्या ठिकाणी परत येते. या सगळ्या प्रक्रियेत शक्तीचे फक्त रूपांतर होत असते हे आता आधुनिक विज्ञानानेही मान्य केले आहे. वैज्ञानिकांच्या मताप्रमाणे संपूर्ण ब्रह्मांडात लहान-मोठ्या परिघांची आणि गतींची अनेक शक्ती वर्तुळं आहेत. प्रत्येक सजीव आणि निर्जीवामधले मूलकणसुद्धा वर्तुळाकारात गतिमान आहेत. सूर्यमालिकेत सूर्याभोवती फिरणाऱ्या ग्रहगोलांच्या रचनेत आणि सजीव-निर्जीवांमध्ये असलेल्या प्रोटॉन्स आणि इलेक्ट्रॉन्सच्या वर्तुळाकार संरचनेत विलक्षण साम्य आहे. किंबहुना विश्वाची हुबेहूब प्रतिमा प्रत्येक अणूमध्ये जशीच्या तशी उपलब्ध आहे याचं आकलन हळूहळू वैज्ञानिकांना होऊ लागलंय, ज्याला अध्यात्माने ‘पिंडी ते ब्रह्मांडी न्याय’ असं म्हटलं आहे. आधुनिक विज्ञान आजही भौतिक शक्तीच्या मर्यादेतच सीमित राहिलं आहे, तर हिंदुस्थानी अध्यात्माने आधिदैविक आणि आध्यात्मिक शक्तीचाही परामर्श घेतला आहे. वैशेषिक दर्शनकार महर्षी कणादांनी हजारो वर्षांपूर्वी सांगितलं की, अणूमध्ये प्रचंड शक्ती सामावलेली आहे आणि ती शक्ती जर मोकळी केली तर संपूर्ण विश्वाचा विध्वंस होऊ शकतो! संकुचित हेतूने घडवलेल्या अणुस्फोटामुळे मानवतेचा झालेला विनाश आणि पुढे होऊ शकणारा संभाव्य विनाश यांनी आज अस्थिरतेचा आकांत माजवला आहे. या पार्श्वभूमीवर अणु-परामाणूंमधील शक्तीचा उपयोग विनाशाऐवजी मानवतेच्या शाश्वत उद्धारासाठी कसा करता येईल याचा हिंदुस्थानी अध्यात्माने केलेला विचार लक्षवेधी ठरतो. महर्षी कणादांनी वैशेषिक दर्शनामध्ये अणुमाहात्म्याचं साद्यंत वर्णन केलं, तर पातंजल

योगदर्शनामध्ये मनुष्यदेहातल्या शक्तिनिर्मितीच्या षट्चक्रांची विस्तृत चर्चा केली गेली.

मानवी देह जसा पदार्थस्वरूप आहे तसाच तो ऊर्जास्वरूपसुद्धा आहे. असंख्य अणु-परमाणूंनी बनलेला स्थूल देह हे त्याचं पदार्थस्वरूप, तर त्या अणु-परमाणूंमध्ये सामावलेली प्रचंड शक्ती हे त्या देहाचं ऊर्जास्वरूप होय! आधुनिक विज्ञानाप्रमाणे देहातील प्रत्येक पेशीला मन असतं. मानवी मनाशी ही पेशीमने संकुलित असल्याने देहातील पेशीनामक आपल्याच सहकाऱ्यांना आरोग्यासाठी केलेली प्रार्थना फलद्रूप होऊ शकते असे आधुनिक संशोधकांचे मत आहे. याचा पुढील भाग म्हणजे अशी प्रत्येक पेशीसुद्धा अणुपरमाणूंनी बनलेली असते. आधुनिक विज्ञानाला ज्ञात असलेला पदार्थातील सर्वात सूक्ष्म भाग म्हणजे इलेक्ट्रॉन पाहता आलेला नाही. कारण त्याला पाहण्याचा प्रयत्न करताच तो आपली जागा बदलतो. मार्गामध्ये त्यानेच ठेवलेल्या अस्तित्व खुणांवरून 'तो आता येथे होता' एवढेच कळते. याचाच अर्थ असा की, त्यालाही मन आहे. प्रत्यक्षात आपण राग, द्वेष, मत्सर यासारख्या द्वैतप्रपंची विचारांमुळे स्वत:च्याच देहात विरुद्ध गती निर्माण करतो. सततच्या चिंतातुर किंवा लोभाच्या विचारांमुळे देहातले अणु-परमाणू सम-संस्कारित होण्याऐवजी विषम-संस्कारित होतात. या सगळ्या प्रक्रियेमागे कारणीभूत असणारी मूळ जाणीव म्हणजे 'मी म्हणजे हा देह आहे' ही देहबुद्धी होय. या भ्रांतीमुळे मनुष्य वैश्विक शक्तीशी एकरूप होण्याऐवजी देहभावनेमध्येच अधिकाधिक बद्ध होत जातो. हीच देहभावना देहातील अणु-परमाणूंमध्येही पाझरते आणि प्रत्येक अणू आपले विभुत्व विसरून 'मी'पणात रममाण होतो.

देहातील अणुपरमाणूंचे असे संकुचित एकत्रीकरण अध्यात्माला अपेक्षित नाही. कारण अध्यात्माचा प्रवास नेहमी विषमतेकडून समतेकडे आणि व्यष्टीकडून समष्टीकडे होत असतो. मानवी देहाच्या अणु-परमाणूंमधील सुप्त शक्तीचे प्रकटीकरण म्हणजेच अणुशक्ती स्फोट अध्यात्माला अपेक्षित असतो. मनाच्या सर्व शक्ती जेव्हा एका अग्रापाशी केंद्रित होतात, तेव्हा त्यालाच एकाग्रता म्हणतात. पूर्ण एकाग्रतेने केलेल्या आध्यात्मिक साधनेमुळे देहातल्या अणूमध्ये स्फोट घडू लागतात आणि प्रत्येक अणुपरमाणूंमधून शक्ती मुक्त होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते.

कुठल्याही दोन अणूंची जुळवणूक त्यागाशिवाय सिद्ध होत नाही असे विज्ञान सांगते तद्‌वतच शक्ती आणि गती यांची योग्य जुळवणूकही त्यागाशिवाय सिद्ध होत नाही. अगदी श्वासोच्छ्वास प्रक्रियेचा जरी विचार केला तरी आधी घेतलेला श्वास सोडल्याखेरीज पुढील श्वास घेता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

एकाग्रतेद्वारे मुक्त झालेली अणुशक्ती, निसर्गाच्या वर्तुळाकार गतिनियमांप्रमाणे परत मिळण्यास म्हणूनच कुसंस्कारांचा द्वैतप्रपंची विचार आणि आचारांचा त्याग आवश्यक ठरतो. तेव्हाच मुक्त झालेली ही शक्ती वर्तुळाकार गतीने संपूर्ण विश्वाला गवसणी घालून पुन्हा साधकाकडे परत येते ती गुणकाराने वर्धित होऊन! यालाच आदान-विसर्ग म्हणतात.

हे विश्वचि माझे घर ।
ऐसि मति जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर ।
आपणचि झाला ।।

या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे 'मी'पणाची वैयक्तिक अस्तित्वाची जाणीव त्यागून देहातला प्रत्येक अणू 'मी स्वत:च ब्रह्म आहे' अशा सर्वसमावेशक भावनेने सुसंस्कारित होतो, तेव्हा त्याचं वेगळं अस्तित्व शिल्लक न राहिल्यामुळे तो वैश्विक शक्तीशीच एकरूप होतो. सागरातला थेंब जोपर्यंत स्वत:च्या क्षुल्लक अस्तित्वाचा अहंकार बाळगतो तोपर्यंत त्या थेंबाला कवडीची किंमत नसते, परंतु जेव्हा हा थेंब सागरात विलीन होतो, सागराशी पूर्णपणे एकरूप होतो तेव्हा त्याची जाणीव विशाल होते आणि तो म्हणतो 'मी समुद्र आहे'!

।। हरि ॐ ।।

- बापट गुरुजी